सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालयात आहार सेवा पुरविण्यासाठी महिला बचत गटांची निवड करण्यास प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रशामा २०२५/प्र.क्र.१७१ /रूशआ (ई.क्र १२५०७३१)

०८ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०४ ऑगस्ट, २०२६.

वाचा:-

१. शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. प्रशामा-२०२५/प्र.क्र.१७१/रूशआ-१ (ई.क्र.१२५०७३१), दि. २९.१०.२०२५.
२. आयुक्तालय आरोग्य सेवा, आरोग्य सेवा, मुंबई महाराष्ट्र यांचा प्रस्ताव पत्र क्र. आसेआ/कक्ष-३/टे-९/आहार सेवा/प्रशासकीय मान्यता/८४०५-६/२०२६, दि. १२.०६.२०२६ व दि. १३.०७.२०२६.
३. महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण -२०२४

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये , ग्रामीण रुग्णालये व इतर रुग्णालयांमध्ये दररोज मोठ्या संख्येने आंतररुग्ण उपचार घेत असतात. अशा रुग्णांना त्यांच्या वैद्यकीय उपचारांसोबतच स्वच्छ, सुरक्षित, पौष्टिक, संतुलित व वेळेवर आहार उपलब्ध करून देणे ही सार्वजनिक आरोग्य विभागाची महत्त्वाची जबाबदारी आहे. रुग्णाच्या उपचार प्रक्रियेत गुणवत्तापूर्ण आहार हा उपचाराचा अविभाज्य घटक असून त्याद्वारे रुग्णाच्या आरोग्य सुधारण्यास गती मिळते तसेच कुपोषण, संसर्ग व इतर गुंतागुंत कमी होण्यास मदत होते.

महाराष्ट्र शासनाने **महिला धोरण-२०२४** मंजूर केले असून या धोरणामध्ये विविध विभागांच्या योजना व कार्यक्रमांद्वारे महिलांच्या उद्योजकतेला, आर्थिक सक्षमीकरणाला व नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले आहे. विशेषत: आरोग्य, पोषण, सार्वजनिक वितरण व्यवस्था, मध्यान्ह भोजन, तसेच इतर शासकीय सेवा व व्यावसायिक उपक्रमांमध्ये महिला स्वयं-सहाय्यता गटांना प्राधान्याने संधी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुसार, **महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान** (MSRLM) अंतर्गत स्थापन व कार्यरत असलेल्या पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील २०० पेक्षा कमी खाटा पर्यंत क्षमतेच्या रुग्णालयात आहार सेवा उपलब्ध करून देण्याची संधी प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांना शाश्वत रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध होतील तसेच सार्वजनिक आरोग्य

विभागाच्या अखत्यारीतील २०० पेक्षा कमी खाटा पर्यंत क्षमतेच्या रुग्णालयात रुग्णांना दर्जेदार, पौष्टिक, सुरक्षित व वेळेवर आहार सेवा उपलब्ध होईल.

उद्दिष्टे (Objectives)

यामुळे पुढील उद्दिष्टे साध्य होतील.

१) सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील आंतररुग्णांना स्वच्छ, सुरक्षित, पौष्टिक, संतुलित, गुणवत्तापूर्ण व वेळेवर आहार सेवा उपलब्ध करून देणे.

२) महिला स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण-, स्वयंरोजगार, उद्योजकता व शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे.

३) संबंधित रुग्णालयाच्या तालुका कार्यक्षेत्रातील पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटांचे वस्तुनिष्ठ, पारदर्शक, गुणवत्ता-आधारित मूल्यांकन करून त्यांचे पॅनेल (Empanelment) तयार करणे.

४) सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये आहार सेवा पुरविताना भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) यांच्या निकषांचे, पोषण मानकांचे, स्वच्छतेच्या नियमांचे व रुग्णालयाने मंजूर केलेल्या आहार तक्त्याचे पालन सुनिश्चित करणे.

५) जिल्हास्तरीय व विभागीय स्तरावर प्रभावी देखरेख, कार्यप्रदर्शन मूल्यांकन, गुणवत्ता नियंत्रण व तक्रार निवारण यंत्रणा निर्माण करून आहार सेवेची सातत्यपूर्ण गुणवत्ता सुनिश्चित करणे.

६) स्थानिक स्तरावरील महिला स्वयं-सहाय्यता गटांना प्राधान्य देऊन स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर, वाहतूक खर्चात बचत, वेळेवर आहार वितरण व स्थानिक रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देणे.

७) सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये पारदर्शक, उत्तरदायी, गुणवत्ताधारित व शाश्वत आहार सेवा व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे.

वाचा येथील क्र. १ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रूग्णालयातील आहार सेवा पुढे सुरू ठेवण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. वाचा येथील क्र. २ च्या आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई महाराष्ट्र राज्य यांच्या प्रस्तावान्वये दि. २९.१०.२०२५ च्या शासन निर्णयामधील परीच्छेद क्र.६ मधील अटी व शर्ती यामध्ये बदल करून २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालयाकरिता आहार सेवा पुरवण्यासाठी खालील प्रमाणे अटी व शर्ती लागू करण्याची व स्वतंत्र प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्याच्या महिला धोरण २०२४ मधील महिला सक्षमीकरणाच्या तरतुदीच्या अनुषंगाने सावर्जनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालयाकरीता स्थानिक स्तरावर महिला स्वयं-सहाय्यता गटांमार्फत आहार सेवा उपलब्ध करून

देण्यात यावी, तसेच खाली नमूद केल्याप्रमाणे पारदर्शक पद्धतीने निवड प्रक्रिया राबवून महिला स्वयं-सहाय्यता गटांची निवड करण्यात यावी.

०२. संबंधित **जिल्हा शल्यचिकित्सक** यांच्या नियंत्रणाखाली, संबंधित रुग्णालय ज्या तालुक्यात स्थित आहे त्या तालुक्यातील पात्र व कार्यरत महिला स्वयं-सहाय्यता गटांकडून अर्ज मागवून वस्तुनिष्ठ, पारदर्शक व गुणांकनाधारित पद्धतीने महिला स्वयं-सहाय्यता गटांचे पॅनेल तयार करावे. निवड झालेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटांमार्फत सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये निर्धारित अटी व शर्तीनुसार आहार सेवा उपलब्ध करून घ्यावी.

महिला स्वयं-सहाय्यता गटांच्या (SHG) निवडीचे निकष (१०० गुण)

पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटांची निवड गुणांकनाधारित (Performance Based Selection) पद्धतीने करण्यात यावे. प्रत्येक पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटाचे एकूण १०० गुणांपैकी मूल्यांकन करण्यात यावे. संबंधित सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या जवळ कार्यरत असलेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटांना कार्यसुलभता, आहार वितरणातील सातत्य व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने प्राधान्य देण्यात यावे. सदर **खालील नमूद गुणांकन प्रणालीच्या आधारे** संबंधित सार्वजनिक आरोग्य संस्थेसाठी महिला स्वयं-सहाय्यता गटांचे पॅनल करण्यात यावे.

महिला स्वयं-सहाय्यता गटांच्या निवडीसाठी गुणांकन निकष

अ.क्र.	निकष	कमाल गुण
१	महिला स्वयं-सहाय्यता गटाचे कार्यप्रदर्शन (SHG Performance)	२५
२	आहार सेवा उद्योजकतेचा अनुभव (Food & Entrepreneurship Experience)	२५
३	मनुष्यबळ व कौशल्य (Manpower & Skill)	१५
४	आर्थिक क्षमता (Financial Capability)	२५
५	सामाजिक विश्वासार्हता व शिफारस (Social Standing)	१०
	एकूण	**१००**

(अ) महिला स्वयं-सहाय्यता गटाचे कार्यप्रदर्शन - २५ गुण

निकष	गुण
१. ५ वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून कार्यरत	५
२. नियमित बचत	५
३. कर्जाची १००नियमित परतफेड %	५
४. A श्रेणीचे ग्रेडिंग	१०
एकूण	**२५**

(ब) आहार सेवा उद्योजकतेचा अनुभव - २५ गुण

निकष	गुण
१. आहार पोषण/आधारित उद्योगाचा अनुभव	१०
२. सामुदायिक स्वयंपाकाचा अनुभव	५
३. कृषी प्रक्रिया (Agro Processing) अनुभव	५
४. मागील ४ वर्षात प्रदर्शन, मेळावे इत्यादींमध्ये सहभागी फूड स्टॉल ची संख्या (संख्येनुसार गुण द्यावेत)	५
एकूण	**२५**

(क) मनुष्यबळ व कौशल्य - १५ गुण

निकष	गुण
१. मागील दोन वर्षात NPA नसणे	१०
२. प्रशिक्षित व पुर्ण वेळ लिपीक कर्मचारी उपलब्ध असणे	५
एकूण	**१५**

(ड) आर्थिक क्षमता - २५ गुण

निकष	गुण
१. Community Investment Fund (CIF) चा वापर केल्याचा अनुभव	५
२. प्रशिक्षित महिला सदस्य उपलब्ध	५
३. स्वतःचे आर्थिक योगदान / भागभांडवल	५
४. LOKOS पोर्टल वर आर्थिक व्यवहार अद्यावत असणे	१०
एकूण	**२५**

(ई) सामाजिक विश्वासार्हता - १० गुण

निकष	गुण
१. ग्रामपंचायत स्थानिक स्वराज्य संस्थेची शिफारस /	५
२. व्हिलेज ऑर्गनायझेशन (VO)/VLF ची शिफारस	५
एकूण	**१०**

गुणांकनानुसार निवड प्रक्रिया

१. ८० किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणारे महिला स्वयं-सहाय्यता गटांचे पॅनेल यादीसाठी पात्र राहतील.

२. ७० ते ७९ गुण प्राप्त करणाऱ्या महिला स्वयं-सहाय्यता गटांची प्रतीक्षा यादी (Wait List) तयार करण्यात येईल. पॅनेलमधील निवडलेला गट आहार सेवा सुरू करण्यास किंवा पुढे चालू ठेवण्यास असमर्थ ठरल्यास गुणानुक्रमे प्रतीक्षा यादीतील गटांचा विचार करण्यात येईल.

३. ७० गुणांपेक्षा कमी गुण प्राप्त करणारे महिला स्वयं-सहाय्यता गट निवड यादीसाठी अपात्र राहतील.

४. प्रत्येक सार्वजनिक आरोग्य संस्थेसाठी संबंधित तालुक्यातील ८० किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या कमाल १० पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटांची गुणवत्ता यादी गुणानुक्रमे तयार करण्यात यावी. यामधून गुणानुक्रमे प्रथम गटाची निवड ही जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत जिल्हा शल्यचिकित्सक व निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क), आहारतज्ञ यांच्या उपस्थितीत पारदर्शक पध्दतीने करण्यात यावी, तसेच गुणानुक्रमे उर्वरित ०९ पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटांची प्रतीक्षा यादी तयार ठेवावी. गुणानुक्रमे निवड केलेल्या प्रथम पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटांना संबंधित तालुक्यातील २०० पेक्षा कमी असलेल्या खाटांच्या रुग्णालयाकरिता आहार सेवा पुरविण्याकरीता समिती मार्फत निवड करुन निवड प्रक्रिया कार्यवाहीचे इतिवृत्त नोंदविण्यात यावे व ते इतिवृत्त अंतिम राहील सदरच्या कार्यवाही नंतर निवड केलेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटांना कार्यादेश देण्यात यावेत.

५. गुणानुक्रमे निवड केलेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटाचा कार्यादेशाचा कालावधी हा १ वर्षाकरीता लागु राहील. महिला स्वयं-सहाय्यता गटाचा काम समाधानकारक असल्यास १ वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

६. गुणानुक्रमे प्रथम क्रमांकास समान गुण अथवा एक किंवा त्यापेक्षा अधिक महिला स्वयं-सहाय्यता बचत गट आल्यास ईश्वर चिठ्ठी पध्दतीने अवलंब करुन पारदर्शक पध्दतीने, प्रथम क्रमांकाची निवड करावी.

७. त्या संबंधित तालुक्यात एक पेक्षा अधिक आरोग्य संस्था (रुग्णालये) असल्यास त्याबाबत गुणानुक्रमे पुढील पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटाचा विचार करावा.

८. निवड झालेला महिला स्वयं-सहाय्यता गट कार्यादेश स्वीकारण्यास नकार देत असल्यास किंवा सेवा सुरू करण्यात अपयशी ठरल्यास अथवा काही कारणास्तव त्यांच्या सेवा रद्द झाल्यास प्रतीक्षा यादीतील गुणानुक्रमे पुढील पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटास संधी देण्यात यावी.

९. संबंधित तालुक्यात ८० किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झालेले १० पात्र महिला स्वयं-सहाय्यता गट उपलब्ध नसल्यास ७० ते ७९ गुण प्राप्त केलेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटांचा विचार करण्यात येईल.

१०. संबंधित तालुक्यात कोणताही पात्र महिला स्वयं-सहाय्यता गट उपलब्ध नसल्यास लगतच्या व कमी अंतरावरील तालुक्यातील, त्यानंतर आवश्यक असल्यास त्याच जिल्ह्यातील इतर तालुक्यातील पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटांचा विचार करण्यात यावा.

११.पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटांची प्रतीक्षा यादी गुणांच्या उतरत्या क्रमाने तयार करण्यात येईल. ही प्रतीक्षा यादी करार समाप्ती किंवा पर्यायी व्यवस्थेसाठी (Fallback Arrangement) वापरण्यात यावी.

१२. कार्यादेश दिल्यानंतर नियमाप्रमाणे आहार पुरवठा करण्यास अकार्यक्षम ठरल्यास सदर बचत गट रद्द करून गुणानुक्रमे पुढील पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटाचा विचार करावा तसेच अकार्यक्षम ठरलेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटास कायम स्वरूपी अपात्र करण्यात यावे.

१३. या संदर्भात LOKOS (ॲप) पोर्टलचे, MSRLM MIS पोर्टल वरील संबंधित माहिती अंमलबजावणी समितीस / आरोग्य संस्थेस देणे बंधनकारक राहिल.

<u>महिला बचत गट (SHG) ने किमान पुढील मूलभूत पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक राहील</u> :

१. महिला स्वयं-सहाय्यता गटाची स्थापना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) च्या नियमांनुसार नोंदणी झालेली असावी व गटाला किमान दोन (२) वर्षांचा कार्यानुभव असावा.

२. महिला स्वयं-सहाय्यता गटास MSRLM निकषानुसार 'A' किंवा 'B' श्रेणी (Grade) प्राप्त झालेली असावी.

३. महिला स्वयं-सहाय्यता गटाच्या बँक खात्यात नियमित बचत होत असल्याचा पुरावा (बँक स्टेटमेंट) उपलब्ध असावा.

४. MSRLM च्या निकषांनुसार सर्वसाधारण सभा (General Body) व कार्यकारिणी समितीच्या (Executive Committee) बैठका नियमितपणे आयोजित करण्यात येत असाव्यात.

५. महिला स्वयं-सहाय्यता गटामध्ये किमान १० सदस्य असणे आवश्यक राहील.

६. महिला स्वयं-सहाय्यता गटाच्या नावाने कार्यरत व नियमित आर्थिक व्यवहार असलेले सक्रिय बँक खाते असावे.

७. या निवड प्रक्रियेत सहभागी होण्यास तसेच आहार सेवा चालविण्याबाबत महिला स्वयं-सहाय्यता गटाच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला ठराव (Resolution) सादर करणे आवश्यक राहील.

८. सामुदायिक स्वयंपाकगृह (Community Kitchen), अन्न प्रक्रिया (Food Processing), कॅन्टीन संचालन किंवा तत्सम आहार सेवा क्षेत्रातील पूर्वानुभव असलेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटांना प्राधान्य देण्यात येईल.

९. संबंधित सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या परिसरात किंवा जवळ कार्यरत असलेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटांना प्राधान्य देण्यात येईल.

१०. सार्वजनिक आरोग्य संस्थेपासून कमी अंतरावर स्थित असलेल्या महिला स्वयं-सहाय्यता गटांना, वाहतूक, वेळेवर सेवा उपलब्धता, ताजेपणा, प्रशासकीय सुलभता व प्रभावी देखरेख या बाबी विचारात घेऊन प्राधान्याने विचार करण्यात येईल.

आहार सेवेबाबत अंदाजित प्रस्तावित दर

अ.क्र.	घटक	आधार	रक्कम / दर
१	प्रति रुग्ण प्रतिदिन मूलभूत आहार खर्च	सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केलेला दर	₹ १४५.००
२	अतिरिक्त २०% खर्च (मनुष्यबळ, वीज, एलपीजी/इंधन, स्वयंपाक साहित्य व उपकरणे, वाहतूक व इतर अनुषंगिक खर्च)	मूलभूत आहार खर्चावर	₹ २९.००
३	वस्तू व सेवा कर (GST)	प्रचलित जीएसटी अधिनियम/अधिसूचनेनुसार	लागू असल्यास स्वतंत्रपणे देय
४	महिला स्वयं-सहाय्यता गटासाठी किमान नफा	₹ १७४.०० (₹ १४५ + ₹ २९) या रकमेवर किमान १०% (नफा)	किमान ₹ १७.४० प्रति रुग्ण प्रतिदिन
५	प्रति रुग्ण प्रतिदिन एकूण देय दर (उदाहरणार्थ)	₹ १४५.०० + ₹ २९.०० + किमान ₹ १७.४० + लागू जीएसटी	₹ १९१.४० + लागू जीएसटी

दंडात्मक तरतुदी (Schedule of Penalties)

आहार सेवेची गुणवत्ता, सुरक्षितता व सातत्य सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, जिल्हास्तरीय समितीकडून खालीलप्रमाणे त्रुटीनिहाय आर्थिक दंड आकारण्यात येईल. सदर दंड संबंधित महिला स्वयं-सहाय्यता गटाच्या मासिक देयकातून वसूल करण्यात येईल.

अ.क्र.	त्रुटी / अनियमितता	दंड
१	निर्धारित वेळेपेक्षा उशिरा आहार वितरण (प्रत्येक प्रसंगी)	₹ ५०० प्रति प्रसंग
२	दाखल रुग्णास आहार न देणे किंवा अपुरा आहार पुरविणे	₹ २९० प्रति रुग्ण प्रति वेळ
३	स्वच्छता, अन्न सुरक्षा (FSSAI) किंवा खाद्य गुणवत्तेच्या निकषांचे उल्लंघन	₹ १,००० ते ₹ ५,०००, त्रुटीच्या गांभीर्यानुसार आहारतज्ज्ञ/निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) यांच्या शिफारशीनुसार
४	मंजूर आहार तक्ता (Menu) नुसार आहार न पुरविणे	₹ ५०० प्रति प्रसंग
५	एका महिन्यात तीन किंवा त्यापेक्षा	वरील दंडाव्यतिरिक्त त्या महिन्याच्या देयकाच्या

	अधिक वेळा समान अथवा इतर गंभीर त्रुटी आढळल्यास	१०% इतका अतिरिक्त दंड

१. वरीलप्रमाणे आकारण्यात आलेला दंड संबंधित महिला स्वयं-सहाय्यता गटाच्या मासिक देयकातुन कपात करून वसूल करण्यात येईल.
२. सलग दोन महिन्यांमध्ये एकूण दंडाची रक्कम संबंधित महिन्याच्या बिलाच्या १५% पेक्षा अधिक झाल्यास, सदर बाब सातत्याने निकृष्ट कार्यप्रदर्शन (Persistent Poor Performance) म्हणून ग्राह्य धरली जाईल.
३. अशा परिस्थितीत जिल्हास्तरीय समिती संबंधित महिला स्वयं-सहाय्यता गटास कारणे दाखवा नोटीस व सुनावणीची संधी देऊन करार समाप्त करण्याची शिफारस करू शकेल. करार समाप्त झाल्यास प्रतीक्षा यादीतील गुणानुक्रमे पुढील पात्र महिला स्वयं-सहाय्यता गटास तत्काळ कार्यादेश देऊन आहार सेवा अखंडितपणे सुरू ठेवण्यात येईल.

सावर्जनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालयांकरीता आहार सेवा सुरु करणे व नियंत्रणाकरीता "जिल्हास्तरीय आहार सेवा निवड समिती व देखरेख समिती" व "विभागीय स्तरावरील आहार सेवा कार्यप्रदर्शन पुनर्विलोकन समिती" स्थापन करण्यात येत आहे.

जिल्हास्तरीय व विभागीय स्तरावरील समित्यांची रचना व कार्य पध्दती

बाब	"जिल्हास्तरीय आहार सेवा निवड समिती व देखरेख समिती"	"विभागीय स्तरावरील आहार सेवा कार्यप्रदर्शन पुनर्विलोकन समिती"
समितीचे उद्दिष्ट	महिला स्वयं-सहाय्यता गटांचे (SHGs) पॅनेलीकरण, अर्जांची छाननी, पात्रतेची पडताळणी, गुणांकन, निवड प्रक्रिया, कार्यादेश प्रदान करणे, आहार सेवेचे नियमित निरीक्षण, कार्यप्रदर्शन मूल्यांकन तसेच कराराच्या अटींची अंमलबजावणी करणे.	विभागातील सर्व सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये कार्यरत महिला स्वयं-सहाय्यता गटांच्या आहार सेवेच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवणे, त्रैमासिक कार्यप्रदर्शन आढावा घेणे व आवश्यक सुधारात्मक उपाययोजना सुचविणे.
अध्यक्ष	जिल्हा शल्यचिकित्सक	उपसंचालक, आरोग्य सेवा
सदस्य सचिव	निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क)	सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय)
सदस्य	१. वैदयकीय अधिक्षक संबंधित आरोग्य संस्था २. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांचे जिल्हा अभियान व्यवस्थापक ३. जिल्हा रुग्णालयाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी /	१. विभागातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हा शल्यचिकीत्सक २. विभागातील सर्व जिल्ह्यांचे निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) ३. मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक कार्यालय ४.

बाब	"जिल्हास्तरीय आहार सेवा निवड समिती व देखरेख समिती"	"विभागीय स्तरावरील आहार सेवा कार्यप्रदर्शन पुनर्विलोकन समिती"
	प्रशासकीय अधिकारी ४. आहारतज्ञ	विभागातील सर्व जिल्ह्यांचे आहारतज्ञ
विशेष निमंत्रित	आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी अथवा इतर तज्ञ अधिकाऱ्यांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करता येईल.	आवश्यकतेनुसार संबंधित विषयातील तज्ञ अधिकारी अथवा तांत्रिक तज्ञांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करता येईल.
बैठकीचे वेळापत्रक	आवश्यकतेनुसार / दरमहा	प्रत्येक तीन महिन्यांनी (त्रैमासिक)
मुख्य कार्य	अर्जांची छाननी, कागदपत्रांची पडताळणी, गुणांकन, महिला स्वयं-सहाय्यता गटांची समिती निवड करणे, कार्यादेश प्रदान करणे, मासिक निरीक्षण, गुणवत्ता नियंत्रण, करार अंमलबजावणी, तक्रार निवारण, दंडात्मक कारवाईची शिफारस व आवश्यकतेनुसार करार समाप्तीची कार्यवाही.	जिल्हास्तरीय अहवालांचा आढावा, आहाराची गुणवत्ता, स्वच्छता, अन्नसुरक्षा, पोषणमानके, वेळेवर आहार वितरण, रुग्ण समाधान, आर्थिक व प्रशासकीय अभिलेख तपासणी , करारातील अटींचे पालन यांचे मूल्यांकन करून आवश्यक सुधारणा, दंडात्मक कारवाई किंवा करार समाप्तीची शिफारस करणे.
निर्णय प्रक्रिया	समितीचे निर्णय बहुमताने घेण्यात येतील व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.	समितीच्या शिफारशी व निर्णय संबंधित जिल्हास्तरीय समितीस बंधनकारक राहतील व त्यांची अंमलबजावणी जिल्हास्तरीय समितीमार्फत करण्यात येईल.

महिला स्वयं सहाय्यता बचत गटांना निवड प्रक्रिया समजण्यासाठी पूर्व प्रशिक्षण / मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात.

वरील प्रक्रीया ही जिल्हास्तरावर जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात यावी व सदर प्रक्रियेस उपसंचालक परिमंडळे यांची मान्यता घेवुन पुढील कार्यादेश निर्गमीत करावेत.

सदरचा खर्च लेखाशिर्ष २२१००१४६, २२१०४६२४, २२१००३१५, २२१००२२६, २२१०४२५९, २२१००४१३, या लेखाशिर्षामधुन १९-आहार सेवा या उदीष्टाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातुन भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभाग क्र विअप्र-२०१३/प्र क्र.३०/२०१३/विनिमय, भाग२ दि. १७/०४/२०१५ सोबतच्या परिशिष्ठातील वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८ , भाग- पहिला, उपविभाग-दोन मधील अ. क्र ४, नियम ७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८०४१०११३३७४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY DHONDU DAGALE

Digitally signed by SANJAY DHONDU DAGALE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=91C5AC1BC356EB88DAC279997C206F0BC13AC253742CC3F97488B07C83657B5F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=02E1EAC848EB66AA47BB931E6668D24F8AEF7B3F3FA0341F35962CC85B518C62, cn=SANJAY DHONDU DAGALE
Date: 2026.08.04 13:49:32 +05'30'

(संजय डगळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) प्रधान सचिव-१, सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) महालेखापाल-१/२, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
४) आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई.
५) अभियान संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर, नवी मुंबई.
६) संचालक-१, आरोग्य सेवा, मुंबई.
७) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई.
८) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई.
९) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व परिमंडळे)
१०) सर्व जिल्हा शल्यचिकित्सक.
११) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
१२) वित्त विभाग (कोषागारे/प्रशासन-५), मंत्रालय, मुंबई.
१३) अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय , मुंबई.
१४) निवडनस्ती (कार्यासन - रूशआ-१)